प्रकरण ४ थे

'वऱ्हाडी लोकगाथे' मधील स्त्रियांचे सामाजिक जीवन

प्रकरण ४ थे
'वऱ्हाडी लोकगाथेमधील स्त्रियांचे सामाजिक जीवन'

'वऱ्हाडी लोकगाथा' या पुस्तकात सामाजिक आशयाची, सामाजिक रूढी-परंपरा, चालीरिती यांचे दर्शन घडविणारी अनेक गीते सामाविष्ट केली आहेत. यामध्ये समाजव्यवस्थेचा पाया असणारी कृषी विषयक गीते, तिफणीची गीते (आरती), गुराख्याची गीते, संतगौरव गीते, ठावा गीते, ऐतिहासिक गीते अशा कांही गीतातून स्त्रियांच्या सामाजिक जीवनाचे दर्शन घडते. तत्कालिन स्त्रियांचा सामाजिक व्यवस्थेतील दर्जा कसा होता? किंवा सामाजिक रूढी-परंपरांना स्त्री जीवनात कितपत स्थान होते याबाबतही काही माहिती मिळते. अशी जी काही थोडीबहुत माहिती मिळणार आहे त्यातून स्त्रियांचे सामाजिक जीवन विशद करण्याचा प्रयत्न करणार आहे.

''मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकगीतांच्या निर्मितीत आणि प्रचलनात स्त्रियांचा महत्त्वाचा वाटा आहे. अपौरूषेय वाङ्मयाची निर्मिती स्त्रियांचीच आहे. स्त्री ही समाजाचा एक घटक आहे. समाज संस्कृतीच्या जडण-घडणीत पुरूषाप्रमाणे तिचाही वाटा असतोच ती ज्या समाजात जीवन जगते त्या समाजाच्या जीवनपध्दतीचा परिणाम तिच्या जगण्यावर होणे अपरिहार्य असते. त्या जगण्यातून तिचे जीवन घडत असते आणि या साऱ्यांचा प्रभाव स्त्रीगीतावर असणेही तितकेच स्वाभाविक ठरते. या स्वरूपाच्या प्रक्रियेतून साहित्य आणि समाज यांच्यात एक प्रकारचे अतूट नाते निर्माण होत असते.''[१] असे नाते निर्माण झाल्यावर समाजाचे सारे चित्रच साहित्यात उमटत असते. म्हणूनच लोकजीवनाचा अभ्यास करताना असे साहित्य उपयोगी पडते. लोकगीते देखील याच स्वरूपाची आहेत. त्यातही लोकगीतांची निर्मिती परंपरेने चालत लोकजीवनाचा अविभाज्य घटक बनून राहिली

आहे. स्त्रियांचा या लोकगीतात मोठा सहभाग असल्याने स्त्री गीतांतून घडणाऱ्या स्त्री-जीवनदर्शनाला समाजजीवनाचे अनेक संदर्भ आपोआपच लाभले आहेत.

लोकगीतांचा विचार करता तत्कालिन समाजव्यवस्था कुटुंबव्यवस्था, समाजाच्या अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, रितीरिवाज, लोकांचे विचार या सर्वातून समाजाने निर्माण केलेल्या नीतीकल्पना, बंधने या साऱ्याचा परिणाम मुख्यत: स्त्रीजीवनावर झाला होता हे लोकगीतांतून स्पष्ट होते. त्याकाळी समाजात पुरूषप्रधान संस्कृती अस्तित्वात होती त्यामुळे स्त्रीवर्गाला अर्थातच दुय्यम स्थान होते. त्यामुळे पुरूषप्रधान संस्कृतीचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन दुय्यम वस्तू, कामकरी, विरोध न करणारी, सहनशील असाच होता. त्यामुळे स्त्रीच्या वाटेला अत्यंत दयनीय जीवन आले होते. स्त्री मनाचा कोंडमारा यातून होत होता कारण समाजाने अशीच जाचक बंधने तिच्यावर लादली होती. सासरी निराधार असलेली स्त्री आपली व्यथा मांडू इच्छित होती म्हणूनच तिने जात्याजवळ, त्याच्या संगतीत आपली व्यथा मांडली असावी. मग यातूनच तिच्या सामाजिक जीवनाचे चित्रही समोर येते. हेच समाजाने तिच्यावर लादलेले जीवन आणि त्याला हसत हसत सामोरी जाणारी स्त्री यांचे चित्रण कसे झाले आहे? समाजाचे यांतून दिसणारे काही रितीरिवाज, पध्दती, त्यांच्या कल्पना यांचे शक्य तितके दर्शन घडविण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे.

कृषीव्यवस्थेतील स्त्रीजीवन :-

कृषीव्यवस्थेशी स्त्रीचा अधिक संबंध नसला तरी शेतात मजूरी करणे, भाजी आणणे, पतीला कामात मदत करणे अशा कामात ती कृषीजीवनाशी म्हणजे समाजजीवनाशी निगडीत राहते. कारण कृषीजीवन हे समाजाशी जोडलेले असते. तसेच ग्रामीण भागातील लोकांचा शेतीवर चरितार्थ चाललेला असतो. त्यामुळे त्यांच्या जीवनात शेतीला अनन्यसाधारण महत्व असते.

पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही या शेताविषयी जवळीक आहे आपुलकी आहे कारण हेच शेत आपल्या कुटुंबाला चार घास देणार आहे याची तिला खात्री आहे म्हणूनच शेतात अंग मोडून कष्ट करण्याची तिची तयारी आहे. स्त्रिया देखील या धरित्रीला आपली आईच मानतात. त्यामुळे तिच्यासाठी काम करणे याला त्या आपले कर्तव्यच समजतात.

वऱ्हाडमध्ये कापसाचं पिक मुख्य आहे. मुबलक प्रमाणात कापूस होणाऱ्या वऱ्हाडमधील एक मजूर स्त्री घरधन्याला विनवणी करते आहे

''कापूस येचू येचू दुखतील माझ्या मांड्या
घरधनी माझ्या दादा नोको घेऊ सुकत्या दांड्या''

कारण कापूस वेचताना तिला फार कष्ट पडतात. त्या कष्टाची त्याने कदर करावी अशी स्त्री म्हणते. कापूस मोजताना खोटेपणा करू नकोस असं तिचं मत आहे. थोडक्यात कष्ट करणाऱ्यांचे शोषण करू नको असे सांगत स्त्रीने कष्टाला किंमत दिली आहे हे स्पष्ट होते. तसेच कष्ट करण्याला तिची तयारी आहे पण त्याचा योग्य मोबदला मिळावा अशीही तिची अपेक्षा आहे.

''कापूस येचू येचू दुखतील नखबोटं
कापूस घेणारा नोको लावू मनगट''

धन्याकडून होणाऱ्या शोषणाची तिला खात्री आहे. कारण त्यांची रित तिला माहित असावी म्हणूनच हे धन्या तु आम्हां कष्टकऱ्यांवर अन्याय करू नको अशी केवळ विनंतीच करते आहे.

पेरणीच्या दिवसात प्रत्येकाच्या शेतात पेरणी केली जाते. ज्या स्त्रियांच्या घरी पेरणी असे त्यांना पेरणीच्या दिवशी मोठा उत्सवच असल्यासारखे वाटे कारण पेरणीसाठी शेतात माणसं येत त्यांच्यासाठी लवकर उठून नेहमीपेक्षा अधिक पीठ तिला दळावे लागे. सर्वांना पुरेल असा भरपूर स्वयंपाक करावा लागे पण हे कामही अगदी आनंदाने करताना दिसते. त्यावेळी ती म्हणते

''बारीका पिठाची भाकर फोफेदार

केयीच्या पानावर जेवतील जमादार''

सर्वांना सुंदर जेवण मिळावं व त्यांनी अधिक चांगल व लवकर काम करावं यासाठी तिची धडपड दिसते. हे सर्व करताना आपल कर्तव्यच आहे असे समजून ती काम करे. घरच्या कामाबरोबर, त्रास सहन करत रानातही आनंदाने काम करणाऱ्या या वऱ्हाडी सासरवासनीचे कौतुक वाटते.

शेतात गेल्यावर धन्याची मूठभर भाजी आपल्या मुलाबाळांसाठी मिळावी याची तिला आशा आहे पण हे मालक तेवढी भाजीही गरीबाला मिळू देत नाहीत.

''अंबाळीची भाजी बाई या घेवू नायी देली

सोकारी रायभानानं झाळाले वावू देली.''

पोटासाठी सर्व काही ही स्त्री करते म्हणूनच म्हणते

''धरतरी बाई झाळाझुळाशी पायना

हाती व खुरपं पोट भऱ्याच्या ध्याना''

अशी ही वऱ्हाडी स्त्री आपल्या घरादारासाठी कष्ट करताना दिसते. वऱ्हाडी भाग तसा फारसा समृध्द प्रदेश नसला तरी तिथली स्त्री मात्र आपल्या कष्टाच्या जीवावर त्यावर मात करणारी दिसते. पतीसोबत त्याच्या हाताला हात देवून काम करताना ती दिसते.

''माळी हाके मोट माळीन देते बारी

दोघाच्या स्वारानं पानी याने चिराखाली''

''माळी हाके मोट माळीन मारे हाका

दवऱ्याची काडी मोडली बारी देता देता''

अशा प्रकारे प्रत्येक ठिकाणी पतीला सोबत करणारी दिसते. तरीही तिची कणव कोणाला येत नाही. तिच्या कष्टाचं मोल कोणीच करत नाही तेव्हा मात्र त्रासून ती म्हणते –

''कापूस येचू येचू पनटी पळली सुनी

कोनाच नायी कोणी समज धरा मनी''

म्हणजेच इतरांचं तिच्याबरोबरचं तुटक वागणं तिच्या मनाला फार लागतं म्हणूनच या जगात कोणीच कोणाचं नसतं असा विचार ती सांगून जाते.

विदर्भात सामान्य जीवनात स्त्रीला प्रतिष्ठा नव्हती पण देवांबरोबर देवतांना मानाचं स्थान होत हे निश्चित. म्हणूनच महादेवाला सार्वभौम देव तर पार्वतीला 'आदीशक्ती' म्हणून मान्यता होती. तसेच येथील पुरूषाला महादेव व स्त्रीला पार्वती म्हणण्याची लोकधारणा येथील नाग संस्कृतीचे संकेत आहेत. पण हे स्थान स्त्रीला तर मुळीच नसावे म्हणून बऱ्याच वेळा या देवतांना मानवी रूपे देऊन त्यांना असामान्यातून सामान्यात आणण्याची स्त्रियांची वृत्ती दिसते. अशाच एका गीतातून शंकरापेक्षा आदीशक्ती पार्वती श्रेष्ठ असल्याचे दाखविले गेले आहे. म्हणजेच स्त्री देवतांनाही मानाचं स्थान होतं पण सामान्य, कष्टकरी स्त्रियांना मात्र ते नव्हतं असच दिसतं.

अशी ही वऱ्हाडी स्त्री कृषीव्यवस्थेत स्थान असो नसो पण आपले कर्तव्य मात्र अतिशय प्रामाणिकपणे बजावताना दिसते.

सामाजिक दृष्टीकोन असणारी गीते :-

बऱ्याच भागामध्ये काही विशिष्ट प्रकारची लोकगीते पाहावयास मिळतात. अशाच प्रकारे वऱ्हाड प्रांतामध्ये झेंडवाई गीते, गुराख्याची गाणी, ठावा गीते असे गीतांचे वेगळेपण जाणवते. या गीतांतून स्त्रीजीवनाचे अल्पसे दर्शन घडत असले तरी वऱ्हाडी भागाचं वैशिष्टय म्हणून या गीतांच महत्त्वही आहे.

प्रतिमा इंगोले यांचे बालपण या वऱ्हाडी भागात गेल्याने तेथील बऱ्याच उत्सवाची त्यांना चांगलीच कल्पना आहे. त्यातलाच एक उत्सव म्हणजे दिवाळीच्यावेळी गावामध्ये दिव्यांच्या झेंडवाईला घेऊन गुराख्यांचे फिरणे. हा उत्सव म्हणजे प्रतिमाताईंचाही आवडता उत्सव म्हणूनच त्यांनी आपल्या 'झेंडवाईचे दिवे'

या पुस्तकातील लेखात याबाबतच विवेचन केले आहे. स्त्रियादेखील या गीतात सहभागी असतात. त्याबाबत प्रतिमाताईंनी प्रत्यक्ष एक संवाद सांगितला आहे.

प्रतिमाताई म्हणतात ''आजी, हया झेंडवाईचं गाणं येत असीन ना तुले?''

''व्वा! काऊन नायी. ढोर राखतो त झेंडवाइचं गानं याच लागते जसं बामनाले पूजापाती या लागते तसं आमाले हे! ज्याचा धरम त्याले चुकला का माबाई!''

''सांग मंग मले! खरंच! झेंडवाईचं गाण त रावूनच गेलं''

''लिवा मंग''

आजी सांगू लागली

''दिन दिन दिवायी
गायी म्हशी ओवायी
गायी म्हशी कोनाच्या
रामा लकसुमनाच्या
ईडा झडो! पिडा झडो!
सोन्या रूप्यानं ताट भरो!
गायी म्हशीनं वाळा भरो!
घरचा धनी मौजा करो! ''[२]

वरील संवादावरून वऱ्हाडमधील समाजात अतिशय महत्त्वाचा मानल्या जाणाऱ्या झेंडवाईच्या उत्सवात स्त्रिया देखील पुरूषांदइतक्याच सहभागी होतात. आजींना जमत नसल्यामुळे हे काम त्यांची मुलगीही करते. हे करत असताना खूप फिरावे लागते पण त्यामानाने लोकांकडून बिदागी मिळत नाही ही खंत त्या व्यक्त करतात. थोडक्यात या सामाजिक रितीरिवाजामध्ये स्त्रियांदेखील वाटा उचलतात आणि गावाच्या कल्याणासाठी, सुख समृध्दीसाठी ती देखील प्रार्थना करताना दिसते त्यामुळे येथेही तिचा हेवा वाटतो. त्याचबरोबर वऱ्हाडी गीतांचे वेगळेपण लक्षात येते.

''कापूस येचू येचू पनाटी पळली सुनी

कोनाच नायी कोणी समज धरा मनी''

म्हणजेच इतरांचं तिच्याबरोबरचं तुटक वागणं तिच्या मनाला फार लागतं म्हणूनच या जगात कोणीच कोणाचं नसतं असा विचार ती सांगून जाते.

विदर्भात सामान्य जीवनात स्त्रीला प्रतिष्ठा नव्हती पण देवांबरोबर देवतांना मानाचं स्थान होत हे निश्चित. म्हणूनच महादेवाला सार्वभौम देव तर पार्वतीला 'आदीशक्ती' म्हणून मान्यता होती. तसेच येथील पुरूषाला महादेव व स्त्रीला पार्वती म्हणण्याची लोकधारणा येथील नाग संस्कृतीचे संकेत आहेत. पण हे स्थान स्त्रीला तर मुळीच नसावे म्हणून बऱ्याच वेळा या देवतांना मानवी रूपे देऊन त्यांना असामान्यातून सामान्यात आणण्याची स्त्रियांची वृत्ती दिसते. अशाच एका गीतातून शंकरापेक्षा आदीशक्ती पार्वती श्रेष्ठ असल्याचे दाखविले गेले आहे. म्हणजेच स्त्री देवतांनाही मानाचं स्थान होतं पण सामान्य, कष्टकरी स्त्रियांना मात्र ते नव्हतं असच दिसतं.

अशी ही वऱ्हाडी स्त्री कृषीव्यवस्थेत स्थान असो नसो पण आपले कर्तव्य मात्र अतिशय प्रामाणिकपणे बजावताना दिसते.

सामाजिक दृष्टीकोन असणारी गीते :-

बऱ्याच भागामध्ये काही विशिष्ट प्रकारची लोकगीते पाहावयास मिळतात. अशाच प्रकारे वऱ्हाड प्रांतामध्ये झेंडवाई गीते, गुराख्याची गाणी, ठावा गीते असे गीतांचे वेगळेपण जाणवते. या गीतांतून स्त्रीजीवनाचे अल्पसे दर्शन घडत असले तरी वऱ्हाडी भागाचं वैशिष्टय म्हणून या गीतांच महत्त्वही आहे.

प्रतिमा इंगोले यांचे बालपण या वऱ्हाडी भागात गेल्याने तेथील बऱ्याच उत्सवाची त्यांना चांगलीच कल्पना आहे. त्यातलाच एक उत्सव म्हणजे दिवाळीच्यावेळी गावामध्ये दिव्यांच्या झेंडवाईला घेऊन गुराख्यांचे फिरणे. हा उत्सव म्हणजे प्रतिमाताईंचाही आवडता उत्सव म्हणूनच त्यांनी आपल्या 'झेंडवाईचे दिवे'

या पुस्तकातील लेखात याबाबतच विवेचन केले आहे. स्त्रियादेखील या गीतात सहभागी असतात. त्याबाबत प्रतिमाताईंनी प्रत्यक्ष एक संवाद सांगितला आहे.

प्रतिमाताई म्हणतात ''आजी, हया झेंडवाईचं गाणं येत असीन ना तुले?''

''व्वा! काऊन नायी. ढोर राखतो त झेंडवाइचं गानं याच लागते जसं बामनाले पूजापाती या लागते तसं आमाले हे! ज्याचा धरम त्याले चुकला का माबाई!''

''सांग मंग मले! खरंच! झेंडवाईचं गाण त रावूनच गेलं''

''लिवा मंग''

आजी सांगू लागली

''दिन दिन दिवायी
गायी म्हशी ओवायी
गायी म्हशी कोनाच्या
रामा लकसुमनाच्या
ईडा झडो! पिडा झडो!
सोन्या रूप्यानं ताट भरो!
गायी म्हशीनं वाळा भरो!
घरचा धनी मौजा करो! ''[२]

वरील संवादावरून वऱ्हाडमधील समाजात अतिशय महत्त्वाचा मानल्या जाणाऱ्या झेंडवाईच्या उत्सवात स्त्रिया देखील पुरूषांदइतक्याच सहभागी होतात. आजींना जमत नसल्यामुळे हे काम त्यांची मुलगीही करते. हे करत असताना खूप फिरावे लागते पण त्यामानाने लोकांकडून बिदागी मिळत नाही ही खंत त्या व्यक्त करतात. थोडक्यात या सामाजिक रितीरिवाजामध्ये स्त्रियांदेखील वाटा उचलतात आणि गावाच्या कल्याणासाठी, सुख समृध्दीसाठी ती देखील प्रार्थना करताना दिसते त्यामुळे येथेही तिचा हेवा वाटतो. त्याचबरोबर वऱ्हाडी गीतांचे वेगळेपण लक्षात येते.

'ठावा गीते' ही देखील वऱ्हाडी लोकगीताचे वैशिष्टय आहे. नागपूजा करताना ही गीते म्हटली जात. श्रावणामध्ये याची पूजा बांधली जाते याविषयी अधिक माहिती सांगताना डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात की, ''महाराष्ट्रात बाऱ्याची भजने म्हटली जातात. बारी ही प्रामुख्याने पानमळे पिकविणारी जात. नागिलीची पाने, नागिलीच्या पानांचे उत्पादन करणे व त्याची विक्री करणे हा त्यांचा पारंपारिक व्यवसाय हया जातीतील काही व्यक्ती नागमंत्री म्हणून प्रसिध्द असतात. नागमंत्री अत्यंत वैशिष्टयपूर्ण पध्दतीने भजने म्हणतात. त्या भजनाच्या प्रभावाने सर्पवीष उतरते अशी समजूत आहे. सर्पवीष उतरावयाची बाऱ्याची भजने इतर जातीचे लोकही म्हणताना आढळतात. त्यांना देखील नागमंत्री म्हटले जाते. वऱ्हाडात या गाण्यांनाच 'ठावा गीते' म्हटले जाते असे दिसते.''[३]

अशा या ठावा गीते म्हणण्याच्या वेगळ्या विधीप्रकाराची माहिती या वऱ्हाडी लोकगीतातून होते.

समाजातील स्त्रियांचे स्थान :-

स्त्री आणि पुरूष हे समाजाचे दोन घटक आहेत पण पुरूषप्रधान संस्कृतीत पुरूषांच्या दर्जा मोठा आहे मात्र स्त्रीकडे दुय्यमतेने पाहिले जाते. ती समाजामध्ये मुक्तपणे वावरू शकत नाही. याला कारण म्हणजे समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन. स्त्रीचे बोलणे, चालणे, वागणे सर्वांवर बंधने असलेली दिसतात. समाजाने जे काही नीतीनियम लावले ते केवळ स्त्रियांसाठी आहेत. त्यासर्वांचे स्त्रियांनी पालन करायचे. यामध्ये काही कसूर झाली तर मात्र समाजाच्या टिकेला सामोरे जावे लागे. त्यामुळे तत्कालीन स्त्री बंधनयुक्त जीवन जगत होती असे म्हटले तरी चालेल.

खालील काही ओव्यांतून स्त्रियांचे सामाजिक विचार तसेच काही सामाजिक चालीरितींवर प्रकाश पडतो. तत्कालीन स्त्री बंधनयुक्त जीवन जगत होती असे म्हटले तरी चालेल. खालील काही ओव्यांतून स्त्रियांचे सामाजिक विचार तसेच काही सामाजिक चालीरितींवर प्रकाश पडतो. तत्कालीन स्त्रीचे विचार, तिचा व्यवहारीपणा

पुढील ओव्यांतुन प्रत्ययास येतो. स्त्री म्हणते आपण जसे वागू तशीच वागणूक आपल्याला इतरांकडून मिळत असते म्हणजेच

''भल्याले भलेपन बुऱ्याले दैन
चंची बागाची बैन''

पण स्त्री स्वत: जरी चांगली वागत असली तरी समाजाकडून मिळणाऱ्या वागणूकीबद्दल तिला वाईट वाटते त्यामुळे हा स्त्रीजन्मच नको म्हणून परमेश्वराला विनंती करते आहे

''अस्तुरी जलम नको घालू शीरहरी
सोवळी आयीबायी लोकाची ताबेदारी''

सासरी आल्यावर केवळ कष्टच करायचं. कारण या कष्टाशिवाय तिला पर्यायच नसतो. परक्या घरातून आलेल्या या मुलीला काम केल्याशिवाय घरामध्ये स्थान नाही. तरीही सतत कामात असलेल्या या स्त्रीची अवस्था वाईटच आहे. शेतात राबणाऱ्या मुक्या बैलासारखी तिची अवस्था झाली आहे. ही केवळ एका स्त्रीची कथा नाही तर समस्त स्त्री जातीची व्यथा या वऱ्हाडी स्त्रीच्या माध्यमातून व्यक्त होत आहे. म्हणून या संपूर्ण स्त्री जीवनाबद्दलची चीड ही वऱ्हाडी स्त्री व्यक्त करते.

''अस्तुरी जलम घालून चुकला
पराया घरी बैल नांदतो एकला''
''वाघ माया पिता मी वाघाची वाघीन
काय करू रामा पळजा अस्तुरी जलम''

म्हणजे आपण केवळ स्त्री आहोत ही एकच खंत तिला लागली आहे. त्यामुळेच हे सारे जीणे आपल्या वाटयाला आले आहे. असेच तिचे म्हणणे आहे.

आपल्यावर घातलेले अनेक निर्बंध आपल्या पायातील बेडी ठरले आहेत. त्यामुळे स्त्री कधी स्वतंत्रपणे जगूच शकली नाही किंवा या पुरूषप्रधान समाजाने

तिला कधी मुभाच दिली नाही हे पुढील ओव्यांतून स्पष्ट होते. अगदी तिचं चालणं, बोलणं, वावरनं याबाबत विचार केला जात असे. हे सांगताना ती म्हणते –

''खांदयावरी शेव कशी जाऊ दनदन
बापाले पाटीलकी चुलत्याने पांडेपन''
''वडील पायातलं जोळवं वाजते माय सटसट
वडील माया जेठं कशी जाऊ दचदच'' तसेच
''पराया पुरूषाची काय बोलायची गोळी
आपुल्या भ्रताराची कामाची शालजोळी''

म्हणजेच स्त्रीने चालावे ते हळूवार, परपुरूषाशी बोलू नये, आपली संस्कृती, शालीनता, नम्रता यांचे पालन करावे अन्यथा टिकेचे लक्ष्य होण्याची शक्यता. तसेच

''जावू गवळनी तुपल्या मासोळ्या मोराच्या
हळू टाक पाय पंगती बसल्या देराच्या''
''हासू नको गोरी तुला हासनं भोवलं
भरल्या सभेमंदी पाली भरताराचं गेल''

यासारख्या ओव्यांतून पारंपारिक स्त्री जीवनपध्दतीवर प्रकाश पडतो. स्त्रियांसाठी आचरण कसे करावे याबद्दलचे नियमच समाजाने घालून दिले होते. स्त्रियांदेखील या नियमाच्या चौकटीबाहेर सहसा गेलेल्या दिसत नाहीत तर त्याप्रमाणेच आपले जीवन व्यतीत करण्याचा त्या प्रयत्न करतात.

त्यातच तेथील स्त्रीजीवनाबाबत आणखी एक दु:खाची बाब म्हणजे मुलीच्या जन्मावरच घाला घालण्याचे काम या समाजाने केले आहे. मुलाचा जन्म सर्वांच्या आवडीचा अर्थात आईचेही मत काही अंशी तसेच असते. कारण आपल्याप्रमाणे आपल्या मुलीचे हाल होऊ नयेत अशी तिची इच्छा असेल पण आईला मुलचीच ओढ अधिक असल्याचे दिसते. मात्र मुलगा हा वंशाचा दिवा मानला जात असल्याने सर्वांच्या इच्छेसाठी तिला तो हवाच असतो म्हणून ती म्हणते –

''देवानं देल्या पोरी देवा घरच्या रंभा

एक लाल देजो माया सावलीचा आंबा''

''माय म्हने कसं केलं महादेवा

पोटी नायी पुत्रफये कोन करील आपली सेवा''

कारण ''लेकी तुयी जात बायाची जायाची

लेका तुयी जात कावळ काशीले न्यायची''

यासाठी मुलगा हवा असतो. शिवाय

''लेकीचं लेकरू पंढरीचा पोवा

लेकाचं लेकरू कुळीतला दिवा''

अशी समाजधारणा असल्याने स्त्रीचाही नाईलाज होता त्यामुळे आपल्या मुलीला ती म्हणते

''लाळाची लेक दई मांगे दुपारा

जानं परघरा असा छंद नाही बरा''

सासरी गेलेल्या मुलीलाही सासरी नांदण्यास सांगते. तिला होणारा त्रास कानी आला तरी जगासाठी, लोक काय म्हणतील यासाठी,

''माय म्हने जानं लेकी बाई तू नांदजो भल्यानं

उपट सोयरा नित करते गन्हान''

आईची मुलीबाबतची भूमिका तितकीशी टोकाची नाही पण पुरूष असणारा मुलीचा पिता आपल्या मुलीविषयी जे काही बोलतो त्यावरून तत्कालिन मुलीची व स्त्रियांची किती प्रखरपणे हेटाळणी केली आहे हे दिसते.

''बाप म्हने लेकी लहानपनी मेली नाई

जहराची पुळी मले वान्यानं देली नाई''

''बाप म्हने लेकी खालच्या मानेने नाजो बेटा

जमाना आला खोटा कुळाले लागीन बट्टा''

''बाप म्हने लेकी नसिबाची हिन

डोंगर सोदिता पानं पयासले तीन''

''बाप म्हने लेकी नांदून कर नाव

भवताली हायेत सोयऱ्या धायऱ्याचे नाव''

अशा प्रकारे मुलींनी काय करावे, कसं वागावं यावर लक्ष ठेवणं त्याबाबत मुलीला सुचविणे, तसं वागायला सांगणे हे तर बाप करतोच पण त्याचबरोबर काही वेळा ही मुलगी नसती तर बरे झाले असते असेही ते म्हणतात. म्हणूनच चांगल्या वाईटाचा विचार न करता मुलींची तो लग्न लावून देतो पण स्त्रीला हे पटत नाही तेव्हा ती सांगते की,

''बापानं देल्या लेकी नायी पायलं घरदार

लेकी लुटल्या पैशाभार'' तसेच

''लेकीच्या बावाजीनं लेकीची केली माती

कसाबाच्या घरी गाय बांधली पारावती''

असा हा पुरूषप्रधान संस्कृतीतील बाप मुलींना ओझ मानतो. तिच्याविषयी प्रेम तर नाहीच पण तिच्या भवितव्याचा विचार न करता कुठेही लग्न लावून मोकळा होतो येथेही. ही काही एकाच मुलीची व्यथा नाही तर संपूर्ण वऱ्हाड प्रांतातील मुलींची व्यथा आहे म्हणूनच वरील विचार करणाऱ्या समाजात स्त्री खरोखरच सुरक्षित होती का? ती स्वतंत्र होती का? हे प्रश्न पडल्याशिवाय रहात नाही.

स्त्रीकडे स्वतंत्रपणे विचार करण्याची ताकद असली तरी ती स्वतंत्रपणे जीवन न जगता इतरांवर अवलंबून असलेली दिसते. लहानपणी पित्याच्या, मोठेपणी पतीच्या तर म्हातारपणी मुलाच्या आधाराशिवाय ती जगूच शकत नाही असा समज तिने करून घेतला होता त्यामुळे ती स्वत:ला दुबळी समजत होती व याच पुरूषाकडे आधार म्हणून पाहत होती. स्त्रियांच्या या विचारसरणीला हा समाजच जबाबदार आहे. स्त्री स्वत:च म्हणताना दिसते की,

''दुबळी देवा मी दुबळी कशानं

माया बाळाचं मले भारी भूषान'' किंवा

''दुबळी देवा मी बापा दुबळी कशानं

पाठी भाऊ, पोटी पुत्र दोन''

अशा प्रकारे कधी मुलांचा, कधी बापाचा तर कधी भावाचा आधार शोधताना दिसते. यावरूनही तिचे समाजातील स्थान लक्षात येण्यास मदत होते.

संत जीवनाविषयी स्त्रियांच्या भावना :-

संत तुकाराम, ज्ञानेश्वर हे संत साऱ्या महाराष्ट्राला परिचित आहेत यात संतांच्या कौतुकाचे पोवाडे उभा महाराष्टच गात असतो. येथेही वऱ्हाडी भागातील स्त्रिया या संताच्या कर्तृत्वाविषयी गुणगान करताना दिसतात. तेथील लोकांच्या सामाजिक जीवनामध्ये संतांना फार महत्त्व दिले गेले आहे. तत्कालिन अशिक्षित, अडाणी समाजाला विदयेचा मार्ग दाखविणे, चांगल्या वाईटाची समज देणे, समाजातील लोकांना योग्य मार्गी लावणे, अध्यात्माची शिकवण देणे, तसेच अंधश्रध्दाळू समाजाला उपदेश करण्याचे, समाज प्रबोधनाचे काम या संतांनी केले होते म्हणूनच आज इतक्या वर्षानंतरही आपण त्यांचे गुणगान गातच आहोत. त्यांच्या शिकवणूकीचा पाठपुरावा करत आहोत. अगदी हीच सामाजिक दृष्टी या वऱ्हाडी स्त्रियांकडे असलेली दिसते. या संतांच्या जीवनाविषयी, त्यांच्या कर्तृत्वाची या वऱ्हाडमधील अडाणी, अशिक्षित स्त्रीला चांगलीच माहिती आहे.

तुकारामांच्या विठ्ठल भक्तीची आणि त्यांना सतत विरोध करणारी त्यांची पत्नी जनाबाईविषयी स्त्रिया आपल्या ओव्यांतून भावना व्यक्त करतात. तुकारामासारखा भक्तवत्सल पती तिला मिळाला आहे. शेवटच्या क्षणी अगदी तुकाराम वैकुंठाला जायला निघालेत हे भाग्य जनाबाईला मिळते आहे. मात्र

सामान्याप्रमाणे ती संसारातच अडकली आहे. तिला ईश्वरापेक्षा तिची मुल बाळं हवी आहेत ही कुटुंबवत्सलता सांगताना वऱ्हाडी स्त्री म्हणते –

''तुका गेले वैकुंठा लांबविले हात
येडी जीजाबाई तुवं संसारात चित''
''तुका म्हने जिजा इमानात बस
प्रपंचाच होईन कसं''

अशी प्रपंचाविषयी ओढ असणारी स्त्रीच येथे प्रकट झाली आहे. जन्म देणारी आई असते पित्यापेक्षा मुलांचा अधिक सांभाळ आईच करत असते. त्यामुळे पतीने मुलांकडे पाठ फिरवली तरी स्त्रीला तसे करता येत नव्हते हे प्रत्यक्ष देवतांच्या उदाहरणावरून दिसते.

वऱ्हाडी स्त्रीचा इतर संताविषयी श्रध्दाभाव प्रकट होतो तसाच वऱ्हाड प्रांतातील काही संतमहात्म्याविषयी देखील श्रध्दाभाव प्रकट होतो. स्त्री मनाला या आपल्या कुटुंबाचे कल्याण व्हावे सर्वजण सुखी असावेत असे नेहमीच वाटत असते. त्यामुळे नवस, उपास करणे यात स्त्री अग्रेसर असते पण भावना चांगली असली तरी स्त्रिया येथे अगदी नतमस्तक होतात. बऱ्याचवेळा या साधू संतांच्या ठिकाणी आपली संपत्ती वाया घालवितात. त्यामुळे कधी-कधी हे व्रतवैकल्ये, देवदेव करता करता तिला नुकसानाला बळी जावे लागते. वऱ्हाडी स्त्री श्रध्दाळू आहेच पण अतिश्रध्दा ही अंधश्रध्देला खतपाणी घालत असते याची तिला कल्पना नाही व या महात्म्यांच्या सेवेमध्ये ती इतकी रमते की तिला त्यापेक्षा इतरांची किंमत वाटत नाही म्हणूनच येथे पुंडलिक बाबा किंवा गजानन बाबांच्या आगमनाने ती अतिउत्साहाने त्यांच्या स्वागताची तयारी करते. अगदी त्यांच्या अंघोळीपासून जेवणापर्यंतच्या सर्व गोष्टी ती मोठ्या आनंदाने करते मग चिलिम, गांजा ओढणारे बाबा तिला श्रेष्ठ वाटू लागतात.

असे असले तरी स्त्रीच्या श्रध्दाळू मनातील भावना कृतज्ञतेचीच असते. त्यामधून अंधश्रध्दा डोकावत असली तरी समाजविघातक असे कृत्य त्यांच्या हातून

घडत नाही म्हणूनच समाज उभा करण्यात, त्याला एकत्र बांधून ठेवण्यात या स्त्रीचाच वाटा अधिक असतो. मग तो वाटा कोणी मान्य करो न करो वऱ्हाडी स्त्रीची स्थिती यापेक्षा भिन्न नक्कीच नाही.

समाजातील बदलांविषयीचे स्त्रियांचे विचार :-

वऱ्हाड प्रांत तसा मागासलेला आजही तेथे साऱ्या सुधारणा झालेल्या आहेत असे नाही. परंतु बऱ्याच वर्षापूर्वी इंग्रजी राजवटीत काही थोड्याफार झालेल्या सुधारणामुळे तेथील समाजजीवनात काही बदल झालेले होते. हे बदल तत्कालिन सर्वच लोकांसाठी नवीन होते त्यामुळे हे शोध, झालेल्या नवनविन सुधारणा सर्वसामान्यांच्या कुतूहलाचा विषय बनला होता. यामध्ये चाणाक्षपणे निरीक्षण करणाऱ्या व अनुभव घेणाऱ्या स्त्रियांनी या बदलांविषयी आपले बरे-वाईट विचार मांडले आहेत.

समाजाचा एक घटक म्हणून वावरताना समाजाने पाळलेले सारे रूढी-नियम स्त्रियांनी आपल्या आचरणात आणले होते पण या जीवनातील विविध बारकाव्यांचे निरीक्षण करणे विविध अनुभव घेण्याचे काम याच वऱ्हाडमधील अशिक्षित स्त्रीने केले होते. हे या स्त्रीगीतांतून जाणवते व समाजाकडे पाहण्याच्या स्त्रीच्या विशाल दृष्टीचे येथे प्रत्यंतर येते.

कुंकवाला सर्वात श्रेष्ठ लेणं मानणारी वऱ्हाडी स्त्री मुसलमानांच्या रितीविषयी नापसंती दर्शविते.

''आग लागो बाई मुसलमानाच्या जानीले
सर्व लेनं लेली कुकु नायी कपायाले''

मुसलमान स्त्रीकडे पाहिल्यावर ही खटकणारी गोष्ट ती बिनधास्तपणे सांगते तर जातं माग पडून जेव्हा गिरण्यांचा शोध लागला तेव्हा झालेल्या बदलाने अभिमानीत होऊन सासूला सुनविते की,

''सासू आत्याबाई तुमी दळू दळू मेल्या

आमच्या राजामंधी गिरन्या घरोघरी आल्या''

तसेच इंग्रजी राजवटीबद्दल व त्यांच्या रितीबद्दलही ती आपल मत व्यक्त करते.

''राजामधी राज इंग्रजी राज खोटं
जेवती भावजया नंदा उचलती ताटं''

अशीच उलटी रित या इंग्रजांची आहे. कारण परक्याच्या राज्यात येऊन ते राज्य करत आहेत.

जेव्हा आगगाडी सुरू झाली तेव्हाही रचल्या गेलेल्या काही ओव्यांमधून त्याचा उल्लेख येतो. यावेळी आपलही कुणीतरी यातून येईल असा विचार तिच्या मनात आला असावा म्हणूनच ती म्हणते,

''आगनगाळीचा धूर निंगते भकाभका
कुन्या डब्यात माया सखा''

तसेच ही वऱ्हाडी स्त्री रानात, घरात काम करता करता शिक्षण, राजकारण, स्वातंत्र्य याविषयी देखील बोलताना दिसते. बहुजन समाजात झालेला शिक्षणप्रसार येथे दिसतो. कोणताही बदल चटकन् अंगी बाणवण्याची स्त्रीची कला येथे दिसते त्यामुळे शिक्षणाला ती पाठींबा देताना दिसते कारण त्यातुन आपली मुले मोठी व्यक्ती बनावित अशी तिची इच्छा येथे प्रकट होते.

''शिक्षन शिक बाळा हाती दऊत लेखनी
होशीन बॅरिस्टर बाबासाहेबाच्यावानी''

यासाठी ती शाळेच्या शिक्षकालाही लालूस देते.

''शाळेच्या मास्तराले तूप लोन्याचं जेवन
राघोबाले आले माया इंग्रजी लेहनं''

इंग्रजी शिक्षणही आपल्या मुलांना यावं या तिच्या इच्छेतून तिची आधुनिक विचारसरणी दिसून येते. घरातील राजकारणात फारसा सहभाग नसलेली तेथे दुय्यम

स्थान असलेली ही वऱ्हाडी स्त्री सामाजिक राजकारणात मात्र बिनदिक्कतपणे आपले मत मांडते. मग या कामाच्या रगाड्यातही ती या विषयावर बोलते हे विशेष.

''अंबाळीची भाजी बाई या तीळतो बोंडया बोंडया
कचेरीच्या पुळं काँग्रेस कायतोंड्या''

''कापूस येचता पऱ्हाटीले फुल
काँग्रेस राजात निघाले कंठोल''

''कापूस येचता पऱ्हाटी वायली
आलं काँग्रेस राज जावारी रूपया पायली''

अशा काँग्रेस राज्याचा उल्लेख करते. तर महात्मा गांधी, इंदिरा गांधी यांच्याविषयी तिला आस्था आहे म्हणून म्हणते

''झाळते आंगन उडू देईना फुफाटा
माया अंगनात गांधीबाबाचा मुखवटा''

''बुलढान्याले लागो काळी, मुंबईले लागो दिवा
इंदिराबाईची सभा अकोल्याले घेवा''

असे म्हणत स्त्री नेत्यांविषयी ती अभिमान व्यक्त करते. आपल्या देशाबद्दलही तिला सार्थ अभिमान आहे म्हणूनच देशाचा ती भारतमाता म्हणून उल्लेख करते. स्वत:च्या स्वातंत्र्याची कल्पना असेल नसेल पण भारताच्या स्वातंत्र्याविषयी तिला ओढ आहे.

''आला आला रनगाडा रनगाड्याले कुलूप
बोलली भारतमाता स्वतंत्र झाला मुलूख''

स्त्री जीवनातील विनोदाचे स्थान :-

समाजामध्ये राहताना आजुबाजूचे शेजारी पाजारी यांचा संबंध सहजपणे येतोच. अशा वेळी परस्परांमध्ये वेगवेगळ्या कारणावरून भांडणे होण्याची शक्यता असते. येथे गीतांत मात्र याच भांडणाना विनोदाची झालर देण्याचे काम स्त्रियांनी केले

आहे. त्यामुळे बऱ्याच ओव्यांमधून विनोदाचे दर्शन होते. त्याबरोबरच सामाजिक जीवनाचेही दर्शन घडते.

''दोन बायकाची मोठी हौस गळ्याले
दिवायी सनाले अंघोळ करतो वढ्याले''

''दोघ्या नारीचा धनी बसला आंगनी
इचार करे मनी कोनाले मांगू पानी''

''दोन बायका कशाला केल्या राया
दोन्हीच्या बोलोबोली चाफा चंदन गेला वाया''

''दोघ्या नारी केल्या कवतिकानं
हाती घेतली किंगरी जोगी झाला वैतागानं''

म्हणजेच 'दोन्ही घरचा पाहुणा उपाशी' अशी स्थिती दिसते. तसेच एक पत्नी असताना दुसरी पत्नी केली जात असे. यावरही प्रकाश पडतो पण विनोदाचा भाग सोडला तर दोन बायकांचा एकच पती म्हटल्यावर त्यांच्या वाट्याला येणारी उपेक्षा जाणवते. समाजाने दिलेले दुय्यम स्थान, पतीने दिलेला त्रासही ही स्त्री बऱ्याचवेळा सहन करते मात्र आपला पती कोन्या परस्त्रीबरोबर असेल तर मात्र घरची स्त्री फार मोठ्या अन्यायाला बळी पडते व हे तिला सहन होत नाही. तेव्हा या ओव्यांतून त्यावरही प्रकाश पडतो. घरचं कितीही सोनं असलं तरी पती बाहेरच्या स्त्रीचेच गोडवे गात असतो. सासरी सासूरवास सहन करत जगत असलेल्या स्त्रीवर जर ही वेळ येत असेल तर त्यांच्या दु:खाला पारावार राहत नसेल.

''घरची अस्तुरी कशी पलंगभरून
पराया नारीसाठी उभा वभचन धरून''

''घरच्या अस्तुरीले मिळेना खांडपान
दासीच्या पलंगी लवंगाचं अंथरून''

''घरची अस्तुरी कवंडाचा कोंडा

पराया नारीले पैसे देऊन कानकोंडा''

''घरची अस्तुरी तुयशीचे रोप

पराया नारीसाठी

अशा अवहेलनेमुळे पत्नी खूप त्रासलेली दिसते त्यामुळे परस्त्रीबाबत ती रागाने बोलते.

''मव्हन्या नारीनं मव्हनी घातली दह्यात

लोकाचा भरवार इन घेतला कह्यात''

''मव्हन्या नारीनं मव्हनी घातली ताकात

लोकाचा भरतार ठेवू लागली धाकात''

या स्थितीमुळे सारे घरच उध्वस्त होते पण यामध्ये केवळ स्त्रीचेच हाल होतात. तसेच ज्याअर्थी या ओव्यांतून वरील स्थिती सांगितली आहे त्यावरून हे घडत असावे कारण या स्त्रियांनी बऱ्याच अंशी आपले अनुभवच गीतांतून मांडले आहेत. दोन पत्नीमुळे पतीची गोची होत असली तरी यामध्ये स्त्री दु:खाची बोच काही प्रमाणात जाणवते. त्यामुळे विनोदाबरोबर याला दु:खाची झालर आहे.

स्त्रिया भांडणामध्ये फारच पटाईत असतात ते पुढील ओवीतून दिसते.

''भांडत भांडत नार आली आंगावरी

दुरून बोल नारी थुंका पडतो तोंडावरी''

असे म्हणून समोरच्या स्त्रीच्या रागात ती भर टाकते. तसेच पावलापावलानजीक नातं असतं त्यामुळे भांडण करून नात्यांत कडवटपणा आणू नये असे स्त्री दुसरीला समजाविते.

''आगडे पागडे नको गावू बाई

चिचीले पानं थोडं आपलं गोत लई''

त्याचप्रमाणे काही विनोदी ओवीगीतातून स्त्रियांच्या प्रवृत्तीवर प्रकाश पडलेला दिसतो. रंगेल स्त्रियांच्या विषयी बोलताना ती म्हणते

''दिल्ली दिल्ली करता दिल्लीले लावा किल्ली

कोन्या रंगील्याची नार, कोन्या ठबिल्यानं नेल्ली''

सतत शेजाऱ्यांकडे काहीना काही मागण्याची सवय स्त्रियांना असते त्यामुळे अशा स्त्रीबाबत स्त्रीच म्हणते –

''शेनाले नायी पाटी, पान्याले नायी दोर

कोन्या निढंग्याची नार हिंडते घरोघर''

अशा सवयीवर येथे बोट ठेवले आहे. तसेच ही सून आपल्या सासूबरोबरही विनोद करताना दिसते.

''सासू आत्याबाई तुमचं बसनं दरोज्यात

सासरे मामाजी दचकले अंधारात''

''सासू आत्याबाई तुम्ही चिंध्या चिंध्या नेसा

मले घुबडावानी दिसा''

सासू-सुनेमध्ये असा विनोद होत असेल तर कोणत्याच सासरवाशीणीला त्रास झालास नसता पण हे केवळ गीतापुरतच मर्यादित असेल तर सासू सुनेत ही दरी कायमचीच राहील.

पुढील गीतातील स्त्रियांचे विवेचन ऐकले तर आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. कारण पुरूषप्रधान संस्कृतीची गुलाम असलेली स्त्री व तिच्या दु:खद जीवनात असेही घडले असेल यावर विश्वासच बसत नाही. पतीच्या धाकात राहणारी पत्नी येथे मात्र पतीला धाकात ठेवते आणि उलट म्हणते, पती सकाळी उठून सडा सारवण, झाड-लोट करतो. स्वयंपाक करतो, भांडी घासतो कारण तो माझ्या धाकात आहे असे ती पुन्हा पुन्हा सांगते.

''रोज सकाळी त्यो उठितो सैपाकपानी करितो

हात नाही मी घालत पिठात

बाई मी नवलाखात नवरा माया धाकात''

या गीताच्या वेगळेपणातून तत्कालिन स्त्रीच्या सामाजिक जीवनातील बदल, चढउतार याची कल्पना येते.

प्रस्तुत संग्रहात अगदी वेगळ्या स्वरूपाची गीते आहेत. यामधून स्त्रियांचा समाजामध्ये जगत असतानाचा जीवन विषयक दृष्टीकोन व्यक्त होतो. समाजात भलेही स्त्रीला दुय्यम मानले असेल पण जीवनविषयक अनेक अनुभवांची शिदोरी या स्त्रियांकडेही आहे हे तत्वज्ञान विषयक काही ओव्यांतून स्पष्ट होते. जणू जीवनाचे तत्वज्ञानच ती आपल्या समोर मांडते आहे असे वाटते.

जीवनाचे तत्वज्ञान सांगणारी वऱ्हाडी स्त्री :-

बऱ्याच वेळेला आपणही पाहतो की, आईने, आजीने सांगितलेले अनुभवाचे बोल फार उपयोगी पडतात. असेच काही विचार येथे व्यक्त होतात त्यातून स्त्रीचे संस्कारीत मनही प्रकट होते. व तिच्या विचारांची शिदोरीही जाणवते.

गुरू हे ज्ञानाचे भांडार असते. त्यांच्याकडूनच आपल्याला ज्ञानप्राप्ती होते त्यामुळे या गुरूंची महती मोठी आहे यावर स्त्रीचा विश्वास आहे.

''गुरू गुरू करता गुरू काय देतो
मांडीवर घेऊन सर्व ग्यान शिकवितो''

पुढे स्त्री सांगते संपत्तीचा हव्यास कोणीच धरू नये,संपत्ती आज असते तर उदया नसते. संपत्तीचा गर्व करू नये, संपत्ती कमविण्यापेक्षा माणूसकीची संपत्ती कमवावी. ती आयुष्यभर उपयोगी पडते हे सांगताना ती म्हणते –

''संपत्तीच्या शिरी करा पुरनाची पोयी
संपत गेली निंगून माजी मिळेना मोकयी''
''संसारी येऊन नको करू आपल आपलं
आलं देवाच बलावना जानं पळलं ऐकलं''

तसेच कधी कोणाची संपत्ती आपल्याला मिळावी अशी अपेक्षा ठेवू नये.

''कोनचि घरदार कोनाचे हयली माडी

आली देवाची चिठ्ठी जानं आलं तातडी''

यासाठी पाण्यातील माशाच उदाहरण दिलं आहे.

''पान्यातली मासोयी पान्याचं गुमान

पानी आठल्यावर पाहा तिचा परिणाम''

'गर्वाचे घर खाली' हे सांगण्यासाठी ती म्हणते –

''गरव गुमान नको करू मानसा

पांडवा सारके देव गेले वनवासा''

आपली संगत नेहमी चांगली असावी संगत चांगली तर वळणही चांगले लागते हे सांगताना ती म्हणते, ''कारल्याचा येल निंबावरी गेला

कळू कसा झाला संगती गुन आला''

वरील तत्वज्ञान सांगताना स्वत: स्त्रीने आपली मर्यादा पाळली पाहिजे. स्त्रीचं चारित्र्य हेच तिला फार मोलाचं असत याची जाणीव लहानपणापासून आईच करून देते हे येथे जाणवते.

''मले शिकोल माया माऊलीन

उभी नको रावू पुरूषाच्या सावलीन''

''हासावं बोलावं आपल्या भरताराशी

दुरून सांग गोठ पराया पुरूषाची''

या जीवनामध्ये सुख-दु:ख सतत येतच असतात हे सांगताना ती म्हणते –

''थोड्या दिसाचं चांदन बहु दिसाची अंधारी

डोळ्यावर पट्टी आंधयी झाली गांधारी''

हे सांगून आपल्या जीवनातील अंध:कार ती सांगते आहे कारण कितीही जीव ओतून काम केलं तरी कोणी कौतुकही करत नाही सर्वांच करूनही स्त्रीवर सारे नाराजच असतात म्हणून ती म्हणते–

''जीवासारखा जीव किती देवू मानसाले

धारजीन नायी माया भरल्या हाताले''

त्यामुळे खूप कष्ट करूनही वेळेला कोणीच उपयोगी पडत नाही. कोणी तोंडात घासही घालत नाही तेव्हा या भरल्या संसाराचा काय उपयोग. हे सांगताना ती म्हणते,

''गायीवाल्याच्या गायी, म्हैशीवाल्याच्या म्हैशी

मरनाच्या दिवशी आत्मा चालला उपाशी'' असा सुंदर दाखला देऊन ती आपले मत स्पष्ट करते. स्त्रीला सर्व जन्मात मनुष्य जन्म श्रेष्ठ वाटतो.

''जन्मामंदी जन्म मनुष्य थोर

पक्षात मोर तिरथान रामेश्वर'' यामध्ये स्त्री व पुरूषांना समानच मानावे त्यात भेद करू नये अस तिला मनोमन वाटतं म्हणून ती सांगते –

''अस्तुरी पुरूषात नका लावू पाप

एक वरतून सगळे मायबाप''

असा हा स्त्री जन्म असो किंवा पुरूषजन्म असो पण या मनुष्यदेहाला काम मात्र हवे. कष्टाशिवाय त्याच्या जन्माचं सार्थक होत नाही. असं म्हणून कदाचित ही वऱ्हाडी स्त्री आपल्या न संपणाऱ्या कष्टाचं कौतुक करत असेल किंवा दु:खाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करत असेल.

''चंदन उगाळलं तशी उगळावी देही

मातीची होईन माती सार्थिक होईन कायी''

त्याचबरोबर स्त्री जन्म किंवा स्त्री ही समाजाला अधिक महत्त्वाची आहे असे खालील उल्लेखावरून वाटते.

''अस्तुरी पुरूषाची दोन्हीची पडनड

नळराजाच्या परीस पाणी दमयंतीचं गोड'

असं कदाचित असेलही पण स्त्रीला पती असणे हेच स्त्रीचे भूषण आहे असा हा समाजच मानतो.

''जातीसंग माती कुळासाठी गं लज्जा

आनीक नावासाठी पतीराजा''

कारण आईवडीलांनंतर पती हाच तिचा सोबती असतो. म्हणूनच स्त्री आदराने म्हणते –

''जन्म दिला पित्यानं पानी लावलं मातनं

उचलला भार परनारीच्या सुतानं''

अशा या वऱ्हाडी स्त्रीच्या ओव्यांतून अनेक चांगल्या गोष्टी समजतात. तसेच जीवनाच्या या महासागरात तिने अनेक कंगोरे आत्मसाद केले आहेत. त्याचाच उपयोग ती आपल्या अंध:कारमय जीवनात प्रकाश आणण्यासाठी करते. यामुळे तिला एक प्रकारचे मानसिक समाधानही मिळत असावे. यातून केवळ स्त्रीचेच जीवन प्रदिर्शत होत असे नाही तर एकूणच तत्कालीन लोकांच्या वागण्यातून त्यांच्या प्रवृत्ती लक्षात येण्यास मदत होते. त्यामुळे स्त्रियांच्या या ओव्या म्हणजे त्यांच्या समाजजीवनाचा आरसाच आहे.

तत्कालीन वऱ्हाडी समाजात जातीची चौकट असल्याचे या ओव्यांवरून दिसते. यामध्ये स्त्रियांनी ब्राह्मण, महार, सोनार, ढोर, कोल्हाटी, मारवाडी वगैरे जातींचा उल्लेख केला आहे.

त्यावेळी समाज ब्राह्मण वर्गाचे उच्च स्थान आहे असे मानत होता. त्यामुळे काही ओव्यांतून ब्राह्मण श्रेष्ठ होते किंवा त्यांचे सामान्य जनांवर प्रभाव होता असे दिसते. त्यामुळेच सामान्य स्त्री याच ब्राह्मण स्त्रीबाबत नकारार्थी बोलते.

''जातीमंदी जात बामन्या बाईची

भरल्या सभेत नायी डोईवर पदर घ्यायची ''

म्हणजे इतरांनी सारे रिवाज पाळायचे पण ब्राह्मणांनी मात्र नाही. त्यामुळेच सामान्य स्त्रीला तिचा राग येत असावा. तसेच नवरा बायकोमध्ये सतत कटकट होते त्याचा दोष स्त्री या ब्राह्मणालाच देते. ''अस्तुरी पुरूषात सदायी कटकट

येळ्या बामना कशी पाळली बरमगाठ''

सामान्य जातीतील स्त्रीची गरीबी ही आणखी एक समस्या आहे. उच्च जातीतील लोकांकडून होणारी उपेक्षाही ती गीतामधून मांडते. यासाठी देवालाच विनवणी करते की, ''देवा तुवाच लावली मानसाले जातपात

आता पाठीराखा तूच भगवंत गा

पानी मांगू मांगू तोंडाले

आला फेस गा!

कारण या जाती देवाने निर्माण केल्या आहेत. असा या भोळ्या स्त्रीचा आरोप आहे. याबरोबरच अनेक समस्या या उच्च व कनिष्ठ जातीमुळे निर्माण झाल्या आहेत. हा एक सामाजिक जीवनाचाच एक भाग असल्याने येथेही समाज स्त्रीची त्यातच शूद्र स्त्रीची अवहेलना करताना दिसतो.

अशा या वऱ्हाडी स्त्रीच्या सामाजिक जीवनातील अनेक घटक तिचे सामाजिक राहणीमान, विचार, वृत्ती, समस्या प्रकट करतात.

समारोप :-

प्रस्तुत प्रकरणात स्त्रियांच्या सामाजिक जीवनाची कल्पना देताना वऱ्हाडी लोकजीवन, त्यांच्या पध्दती, रितीरिवाज, स्त्रियांचे सामाजिक विचार, जीवन या गोष्टींची माहिती होते. यासाठी प्रस्तुत संग्रहातील सामाजिक जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या गीतांचे साहाय्य झाले. त्याचबरोबर समाजाने स्त्रियांवर लादलेली बंधने, त्यांच्या श्रध्दा, अंधश्रध्दा व यामध्ये भरडली जाणारी स्त्री यांचेही दर्शन घडते.

वऱ्हाडमधील गीतांचे साह्य घेताना वऱ्हाडमधील काही नविन गीत प्रकार तसेच गीत विषयातील विविधताही सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

तत्कालिन समाज व्यवस्थेची गुलाम असलेली वऱ्हाडी स्त्री बऱ्याच वेळा आपले स्वत:चे दु:ख बाजूला ठेवत समाजाच्या रितीरिवाजांना जवळ करते. त्यामुळे आपल्या इच्छा-आकांक्षांचाही तिला बळी दयावा लागला आहे. पण जीवनाचे तत्वज्ञान सांगताना मात्र याच गुलाम स्त्रीची बुध्दीची चमक दिसून येते.

अशा प्रकारे वऱ्हाडी स्त्रियांचे सामाजिक जीवन दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. पुढच्या प्रकरणात स्त्रियांच्या सांस्कृतिक जीवनाचा आढावा घेणार आहे.

संदर्भ :-

१. 'स्त्री गीतांची सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी', डॉ. विदया व्यवहारे, कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जाने. १९९९, पान नं. १

२. 'झेंडवाईचे दिवे' प्रतिमा इंगोले, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, प्रथमावृत्ती, जाने. २००२, पान नं. ३२,३३

३. 'वऱ्हाडी लोकगाथा', डॉ. सौ. प्रतिमा इंगोले, प्रस्तावना-डॉ. प्रभाकर मांडे, पान नं. ९